# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**पोलीस उपनिरीक्षक (पुरुष व महिला)(बिनहत्यारी)**
**(मुख्य) परीक्षा - २०१०**
**अधिसूचना क्रमांक १४४२ (२) /२०१० / तीन**
**दिनांक : ८ सप्टेंबर, २०१०**

स्वसुख निरभिलाषः
खिद्यते लोकहेतोः


**मुख्य कार्यालय** :- बँक ऑफ इंडियाची इमारत, ३ रा माळा, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई-४००००१.
**दूरध्वनी क्रमांक** :- ०२२-२२६७०२१०, २२६७०१४८, २२६७०२४८, २२६७०३३७.
**फॅक्स क्रमांक** :- ०२२ -२२६७३९१५.

**माझगाव कार्यालय** :- विक्रीकर भवन, ९ वा मजला, रुम नंबर ९१५, सरदार बलवंतसिंग धोदी मार्ग (नेसबीट रोड), माझगाव, मुंबई- ४००२०३.
**दूरध्वनी क्रमांक** :- ०२२ -२३७४२१९१.
**फॅक्स क्रमांक** :- ०२२-२३७८१०६१.

**वेबसाईट** - www.mpsc.gov.in
**ईमेल** - sec_mpsc@maharashtra.gov.in
mpscpre@gmail.com

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## पोलीस उपनिरीक्षक (पुरुष व महिला)(बिनहत्यारी) (मुख्य) परीक्षा - २०१०

राज्य शासनाच्या सेवेतील खाली नमूद केलेल्या पदांवरील / सेवांमधील नियुक्तीकरिता आयोगामार्फत पोलीस उपनिरीक्षक (पुरुष व महिला) (बिनहत्यारी) (मुख्य) परीक्षा - २०१० ही **दिनांक २३ ऑक्टोबर, २०१०** रोजी औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे या ठिकाणी घेण्यात येईल.

**सदर परीक्षेसाठीचा अर्ज विहित पोस्ट कार्यालयात स्वीकारण्याचा अंतिम दिनांक ७ ऑक्टोबर, २०१० हा आहे.**

**२. पदाचा तपशील :-** मुख्य परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे भरण्यात येणा-या पदांचा तपशील खाली नमूद केला आहे.

| | | | | | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **पदाचे नाव व एकूण पदसंख्या** | **अराखीव** | **अ.जाती व त्यातील बौध्द धर्मातरित** | **अ. जमाती** | **वि.जा. (अ)** | **भ.ज. (ब)** | **वि.मा.प्र.** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ.मा.व.** |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| **३** | **पोलीस उपनिरीक्षक (एकूण ६९९ पदे)** | ३४५ | १५२+४* | ४८+६* | १९+२* | २७+१* | १६ | १२+१* | -- | ६६ |
| | महिला - | १०४ | ४७ | १६ | ६ | ८ | ५ | ४ | -- | २० |
| | खेळाडू - | १७ | ८ | ३ | १ | १ | १ | १ | -- | ३ |

**२.१** * अशी खुण दर्शविलेली पदे अनुशेषाची आहेत.

**२.२** वर नमूद केलेल्या पदसं ख्येत व आरक्षणात शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.३** महिलांसाठी व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे संबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत.

**३. मुख्य परीक्षेस प्रवेश :-**

**३.१ पोलीस उपनिरीक्षक (पूर्व) परीक्षा - २०१०** च्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि अधिसूचनेत/माहितीपुस्तिकेत नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेस थेट प्रवेश दिला जाईल. हा प्रवेश अर्जातील माहिती मूळ प्रमाणपत्राबरोबर तपासणीच्या अधीनतेने तात्पुरता असेल.

**३.२** माहितीपुस्तिकेतील परिच्छेद **२.२.५.१** मध्ये नमूद केल्यानुसार **पोलीस उपनिरीक्षक मुख्य परीक्षा - २०१०** तीन टप्प्यात घेण्यात येईल.

**(अ) लेखी परीक्षा :- ४०० गुण.**

**(ब) शारीरिक चाचणी :- २०० गुण.**

**(क) मौखिक व व्यक्तीमत्व चाचणी :- ७५ गुण.**

**३.३** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनी विहित पोस्ट कार्यालयातून मुख्य परीक्षेसाठी अर्ज विकत घेऊन परिपूर्ण भरून आवश्यक कागदपत्र, परीक्षा-शुल्क, छायाचित्र इत्यादीसह **दिनांक ७ ऑक्टोबर, २०१०** पर्यंत पोस्टाच्या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

**३.४ प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी अर्ज आयोगास प्राप्त होण्यापूर्वीच उमेदवारांना थेट प्रवेश देण्यात येणार असल्यामुळे आयोगाने प्रवेश दिलेल्या परीक्षा केंद्रावरच उमेदवारांना मुख्य परीक्षेसाठी उपस्थित रहावे लागेल. परीक्षा केंद्र बदलून मिळणेबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य केली जाणार नाही.**

**३.५ उमेदवाराला आयोगातर्फे परीक्षा केंद्र दिले जाणार असल्यामुळे मुख्य परीक्षेच्या अर्जामध्ये केंद्र संकेतांक नमूद करण्याची आवश्यकता नाही.**

**३.६ आयोगाने विहित केलेल्या कालावधीत उमेदवारांनी अर्ज टपाल कार्यालयात सादर न केल्यास अशा उमेदवारांची मुख्य परीक्षेची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.**

**३.७ पोलीस उपनिरीक्षक (पूर्व) परीक्षा - २०१०** च्या अर्जामध्ये नमूद केलेली जातीविषयक वर्गवारी, क्रिमीलेअर, महिला खेळाडू इत्यादींविषयक दाव्यामध्ये फेरबदल करता येणार नाही.

**३.८** पूर्व परीक्षेचा अर्ज करताना जातीचे, क्रिमीलेअर प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याने केवळ अराखीव पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या वेळी आरक्षित पदासाठी दावा केल्यास तो कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही. तसेच वर्गवारीचा दावा बदलत आहे, ही उमेदवाराची सबब मान्य केली जाणार नाही.

**३.९** मागसवर्गीय, महिला, अथवा खेळाडूंसाठी आरक्षित असलेल्या पदाकरिता दावा करणा-या उमेदवारांनी अर्जातील विहित ठिकाणी आरक्षित पदासाठी निरपवादपणे (Invariably) दावा करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचा आरक्षित पदासाठी विचार केला जाणार नाही.

**३.१०** पूर्व परीक्षेच्या अर्जातील व मुख्य परीक्षेच्या अर्जातील कोणत्याही माहितीमध्ये तफावत आढळून आल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**४. वयोमर्यादा -**

**४.१** दिनांक १ ऑगस्ट,२०१० रोजी किमान १९ वर्षे असावे व २८ वर्षापेक्षा (मागासवर्गाकरिता ३१ वर्षापेक्षा) जास्त नसावे. म्हणजेच उमेदवार दिनांक २ ऑगस्ट, १९८२ च्या पूर्वी आणि १ ऑगस्ट, १९९१ च्या नंतर जन्मलेला नसावा.

**४.२ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम -**

**४.२.१ दिनांक १ जानेवारी, १९६४ ते २५ मार्च, १९७१ या कालावधीत भूतपूर्व पूर्व पाकिस्तानातून भारतात स्थलांतर केलेल्या व्यक्ती यांचे बाबतीत वयोमर्यादा ३ वर्षांनी शिथिलक्षम**

**४.२.२ दिनांक १ नोव्हेंबर, १९६४ नंतर भारतात स्थलांतर केलेल्या व मूळच्या भारतीय असलेल्या श्रीलंकेतील स्वदेशी प्रत्यावर्ती व्यक्ती आणि दिनांक १ जून, १९६३ नंतर ब्रम्हदेशातुन भारतात स्थलांतर केलेल्या व्यक्ती यांच्या बाबतीत पदासाठी विहित केलेली वयोमर्यादा ३ वर्षांनी शिथिल करण्यात येते. स्थलांतरित व्यक्ती अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीपैकी असल्यास त्यांना वयात ५० वर्षांपर्यंतची सूट देण्यात येईल.**

**४.२.३ महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या व महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवाशी असलेल्या अनुसूचित जाती (बौध्दधर्मांतरितासह), अनुसूचित जमाती, तसेच समाजाच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र असलेल्या विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) व इतर मागास वर्ग या संवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा ३ वर्षापर्यंत शिथिलक्षम असेल.**

४.३.४ पात्र खेळाडूंच्या बाबतीत **उच्च वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम राहील.**

**४.३.५** पोलीस उपनिरीक्षक ही पदे शासनाने गट-ब (अराजपत्रित) संवर्गात समाविष्ट केली असल्यामुळे सदर पदांसाठी शासनाने माजी सैनिकांसाठी आरक्षण विहित केलेले नाही. तथापि माजी सैनिकांसाठी उच्च वयोमर्यादा खालीलप्रमाणे शिथिलक्षम राहील.

**४.३.५.१** ज्या माजी सैनिक/आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिका-यांची किमान पाच वर्षे सैन्यात सलग सेवा झालेली आहे व ज्यांना नेमून दिलेले काम पूर्ण झाल्यावर कार्यमुक्त केलेले आहे (यामध्ये ज्यांचे नेमून दिलेले काम पुढील सहा महिन्यात पूर्ण होणार आहे व त्यानंतर त्यांना कार्यमुक्त करण्यात येणार आहे त्यांचाही समावेश असेल). किंवा ज्यांच्या बाबतीत पाच वर्षाचा सैनिक सेवेचा नेमून दिलेला कालावधी पूर्ण झाला आहे व ज्यांची नेमणूक पाच वर्षापुढे वाढवून देण्यात आलेली असून, त्यांना शासकीय सेवेत नेमणूक मिळाल्यास तीन महिन्यात कार्यमुक्त करण्यात येईल, असे प्रमाणित करण्यात येणार असेल अशा व्यक्तींसाठी पाच वर्षे कमाल वयोमर्यादेत सवलत देण्यात येईल, ही सवलत दिनांक १ ऑगस्ट,२०१० पूर्वी सेवामुक्त झालेल्या माजी सैनिक/आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिका-यांनाच लागू राहील.

**४.३.५.२** ज्या माजी सैनिक /आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांची सेवा बडतर्फीने, गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता या कारणांसाठी अथवा सैनिकी सेवेसाठी शारीरिक क्षमता नसल्याने किंवा आजारपणामुळे संपुष्टात आणली आहे, अशा व्यक्ती वयोमर्यादेच्या सवलतीसाठी पात्र ठरणार नाहीत.

**४.३.५.३** एकदा वयोमर्यादेतील सवलतीचा फायदा घेऊन नागरी सेवेत प्रवेश केलेल्या माजी सैनिक / आणीबाणी व अल्पसेवा राजदिष्ट अधिकारी, राज्य शासनाच्या सेवेमध्ये गट-क व गट-ड मध्ये तो धारण करीत असलेल्या पदापेक्षा उच्च श्रेणी वा अन्य संवर्ग यातील नियुक्तीसाठी माजी सैनिक म्हणून अनुज्ञेय ठरविण्यात आलेल्या वयोमर्यादेची सूट सदर नवीन नियुक्तीसाठी देखील अनुज्ञेय राहील.

**४.३.६ विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही. विहित वयोमर्यादा नसलेल्या उमेदवारांनी अर्ज करू नयेत.**

**५. अपंग आरक्षणाबाबत :-** प्रस्तुत पदासाठी **अपंग उमेदवार पात्र नाही.**

**६. अर्हता व अर्हता धारण केल्याचा दिनांक :-**

**६.१ अर्हता :-**

**६.१.१** मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य शैक्षणिक अर्हता.

**६.१.२** मराठीचे ज्ञान आवश्यक.

**६.१.३** शारीरिक पात्रता :- वर नमूद केलेल्या अर्हतेसोबत उमेदवाराची शारीरिक अर्हता खाली दर्शविल्याप्रमाणे असणे आवश्यक आहे.

| पुरुष उमेदवारांकरिता | महिला उमेदवारांकरिता |
|---|---|
| उंची - १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीतकमी)<br>छाती - न फुगविता ७९ से.मी.<br>फुगविण्याची क्षमता किमान ५ से.मी. आवश्यक | उंची- १५७ सें.मी. (अनवाणी) (कमीतकमी) |

**टीप -** पुरुष व महिला उमेदवारांच्या बाबतीत शारीरिक पात्रतेतील उंची व फक्त पुरुष उमेदवारांच्या बाबतीत छातीची मापे ही अत्यावश्यक अट असल्यामुळे या मापांची तपासणी त्यांच्या शारीरिक चाचणीपूर्वी घेण्यात येईल. उंची व छातीविषयक अटी पूर्ण करीत असलेल्या उमेदवारांची पुढील शारीरिक चाचणी घेण्यात येईल. या शारीरिक चाचणीत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची मौखिक व व्यक्तिमत्व चाचणी आयोगाच्या कार्यक्रमानुसार घेण्यात येईल.

**६.२. अर्हता धारण केल्याचा दिनांक :-**

**६.२.१ मुख्य परीक्षेचा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास म्हणजे दिनांक ७ ऑक्टोबर, २०१० पर्यंत अथवा त्यापूर्वी उमेदवाराने अर्हता धारण केलेली असणे आवश्यक.**

**६.२.२** ज्या पदवीसाठी अंतर्वासिता (Internship) किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव निर्धारित केला असेल ती पदवी धारण करणा-या उमेदवारांनी अंतर्वासिता किंवा आवश्यक अनुभव, संबंधित परीक्षेचा **अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास किंवा त्यापूर्वी धारण करणे आवश्यक.**

**७. अर्ज व माहितीपुस्तिका :-**

**७.१** आयोगाने विहित केलेल्या नमुन्यातच अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

**७.२** अर्जासह माहितीपुस्तिका खालील ठिकाणी पोस्टाच्या कार्यालयीन वेळेत विक्रीसाठी उपलब्ध आहे.

| अ.क्र. | जिल्हा | पोस्ट कार्यालये |
|---|---|---|
| **१** | **अहमदनगर** | अहमदनगर -प्रधान डाकघर, श्रीरामपुर - प्रधान डाकघर, अकोले, संगमनेर, राहुरी, नेवासा, शेवगाव, पारनेर, कोपरगाव, पाथर्डी, श्रीगोंदे, कर्जत, जामखेड, राहता. |
| **२** | **अकोला** | अकोला - प्रधान डाकघर , अकोट, बाळापूर, मुर्तिजापूर, तेल्हारा, पातूर,बार्शी-टाकळी. |
| **३** | **अमरावती** | अमरावती -प्रधान डाकघर, परतवाडा- प्रधान डाकघर, नांदगाव-खांडेश्वर, चांदुर रेल्वे, तिवसा, मोर्शी, वरुड, अचलपूर शहर, चांदुर बाजार, दर्यापूर ,अंजनगाव, धारणी, अमरावती कॅम्प, धामणगाव रेल्वे . |
| **४** | **औरंगाबाद** | औरंगाबाद - प्रधान डाकघर, औरंगाबाद- कैंटोमेंट, सिल्लोड, कन्नड, भोकरदन, वैजापूर, गंगापूर, पैठण, बजाजनगर. |
| **५** | **बीड** | बीड - प्रधान डाकघर, गेवराई, कडा, माजलगाव, पाटोदा,केज, अंबेजोगाई, के. धारुर, परळी, |
| **६** | **भंडारा** | भंडारा - प्रधान डाकघर, साकोली , पवनी, तुमसर, ए. डी. प्रोजेक्ट, आमगाव, लाखनी, अर्जुनी-मोरगाव, भंडारा ऑफ, भिवापूर. |
| **७** | **बुलढाणा** | बुलढाणा - प्रधान डाकघर, खामगाव - प्रधान डाकघर, जळगाव, मलकापूर, नांदुरा, चिखली, सिंदखेड राजा, देऊळगाव राजा, मोताळा ,शेगाव, चैतन्यवाडी, लोणार, मेहकर, दाताळा. |
| **८** | **चंद्रपूर** | चंद्रपूर - प्रधान डाकघर, गोंडपिपरी, बी.पी.मिल्स, ब्रम्हपुरी, वरोरा, राजुरा, भद्रावती, चिमूर, नागभीड, मूल, सिंदेवाही, बल्लारपूर, सिमेंट नगर, चंद्रपूर शहर, चंदा, चांदूर, शिवाजी नगर. |
| **९** | **धुळे** | धुळे - प्रधान डाकघर, शिरपूर, शिंदखेडा,साक्री , धुळे शहर, धुळे जयहिंद कॉलनी , दोंडाईचा . |
| **१०** | **गडचिरोली** | गडचिरोली, कुरखेडा, अहेरी, सिरोंचा, अरमोरी, चामोर्शी, देसाईगंज. |
| **११** | **गोंदिया** | गोंदिया - प्रधान डाकघर, अर्जुनी मोर, आमगाव, गोरेगाव, तिरोडा. |
| **१२** | **हिंगोली** | हिंगोली, कळमनुरी, औंढा नागनाथ, बसमत नगर. |
| **१३** | **जालना** | जालना - प्रधान कार्यालय, अंबड, भोकरदन, परतूर. |
| **१४** | **जळगाव** | जळगाव - प्रधान डाकघर, भुसावळ - प्रधान डाकघर, चाळीसगाव- प्रधान डाकघर, चोपडा, यावल, अंमळनेर, एरंडोल, पाचोरा, रावेर, मुक्ताईनगर, पारोळा, भडगाव, जामनेर, धरणगाव, बोदवड. |
| **१५** | **कोल्हापूर** | कोल्हापूर शहर - प्रधान डाकघर, कोल्हापूर - प्रधान डाकघर इचलकरंजी - प्रधान डाकघर, शाहूवाडी, हातकणंगले, बांबवडे, शिरोळ, बिद्री, गारगोटी, कागल, आजरा, चंदगड, हुपरी, गडहिंग्लज,राधानगरी. |
| **१६** | **लातूर** | लातूर - प्रधान डाकघर, अहमदपूर, औसा, निलंगा, उदगीर. |
| **१७** | **नंदुरबार** | नंदुरबार, तळोदा, शहादा, नवापूर. |
| **१८** | **नागपूर** | नागपूर - जी.पी.ओ., नागपूर शहर - प्रधान डाकघर, कामठी - प्रधान डाकघर, काटोल,सावनेर,उमरेड, हिंगणा,<br>नरखेड,कळमेश्वर,मौदा, भिवापूर, कुही. |
| **१९** | **नांदेड** | नांदेड - प्रधान डाकघर, किनवट, हदगाव, भोकर, कंधार, बिलोली, मुखेड, देगलूर, इतवारा, मुदखेड, शिवाजी नगर, धर्माबाद. |
| **२०** | **नाशिक** | नाशिक - प्रधान डाकघर , नाशिकरोड- प्रधान डाकघर, मालेगाव - प्रधान डाकघर, निफाड, सिन्नर, सुरगणा, दिंडोरी, कळवण, आंबड, चांदवड, नांदगाव, येवले, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, देवळा, भगूर, सिडको कॉलनी, देवळाली एम.बी.जी., लासलगाव, मनमाड, मालेगाव कॅन्टोनमेन्ट. |
| **२१** | **उस्मानाबाद** | उस्मानाबाद - प्रधान डाकघर, परांडा, भूम, तुळजापूर, कळंब, अहमदपूर, औसा. |
| **२२** | **परभणी** | परभणी - प्रधान डाकघर, जिंतूर, पाथरी, गंगाखेड, पूर्णा, सेलू, मानवत. |
| **२३** | **पुणे** | पुणे - प्रधान डाकघर , पुणे शहर - प्रधान डाकघर, शिवाजी नगर - प्रधान डाकघर, जुन्नर, खेड, शिरूर, दौंड, भोर, बारामती, इंदापूर. |
| **२४** | **रायगड** | अलिबाग - प्रधान डाकघर, कर्जत, उरण, खालापूर, पेण, रोहा, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, तळा. |
| **२५** | **रत्नागिरी** | रत्नागिरी - प्रधान डाकघर, चिपळूण- प्रधान डाकघर,दापोली, खेड, गुहागर, संगमेश्वर, राजापूर, लांजा. |
| **२६** | **सांगली** | सांगली - प्रधान डाकघर, मिरज - प्रधान डाकघर, खानापूर, शिराळा, जी.मिल्स, तासगाव, जत, |

| | | |
|---|---|---|
| | | कवठे-महंकाळ, आटपाडी, पलुस, कडेगाव, कडेपूर, कोकरुड, माधवनगर. |
| **२७** | **सातारा** | सातारा - प्रधान डाकघर, कराड- प्रधान डाकघर, खंडाळा, फलटण, वाई, महाबळेश्वर, कोळे, कोयना, कोरेगाव, खटाव, औंध, दहिवडी, ढेबेवाडी. |
| **२८** | **सिंधुदूर्ग** | मालवण - प्रधान डाकघर, सावतंवाडी-प्रधान डाकघर, देवगड, कुडाळ, कणकवली, वेंगुर्ले, वैभववाडी, आचरा, बांदा, कट्टा, सी.सी.ओरोस, खारेपाटण. |
| **२९** | **सोलापूर** | सोलापूर- प्रधान डाकघर, पंढरपूर - प्रधान डाकघर, करमाळा, बार्शी, माढा, माळशिरस, मोहोळ, सांगोले, मंगळवेढा, अक्कलकोट. |
| **३०** | **ठाणे** | ठाणे - प्रधान डाकघर, कल्याण - प्रधान डाकघर, पालघर - प्रधान डाकघर, डहाणू ,मोखाडा, जव्हार, वाडा, वसई, भिवंडी, शहापूर, मुरबाड, शहाड, तलासरी, कल्याण आर.एस., अंबरनाथ, वणी, सॅन्डोज बाग, कळंब, अर्णी, विरार, काटेमानिवली, दांडेकर वाडी, उल्हासनगर-४, उल्हासनगर-५. |
| **३१** | **वर्धा** | वर्धा - प्रधान डाकघर, हिंदीनगर, हिंगणघाट, देवळी, इंदिरा मार्केट, कारंजा, आष्टी, सेलू, पुलगाव, सेवाग्राम. |
| **३२** | **वाशिम** | वाशिम, रिसोड, मानोरा, मालेगाव, मंगरूळपीर,कारंजा. |
| **३३** | **यवतमाळ** | यवतमाळ - प्रधान डाकघर, बोरीअरब, पुसद, बाभुळगाव, घाटंजी, राळेगाव, पांढरकवडा, दिग्रस, नेर, उमरखेड, महागाव, मोरगाव रोड, पतंबोरी. |
| **३४** | **मुंबई** | १) काळबादेवी प्रधान डाकघर, रेशम बाजार लेन, मुंबई- २.<br>२) दादर प्रधान डाकघर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, मुंबई- १४.<br>३) चिंचबंदर प्रधान डाकघर, शायदा मार्ग, मस्जीद रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई- ९.<br>४) अंधेरी प्रधान डाकघर, डी.एन.नगर,अंधेरी, मुंबई- ५३.<br>५) चेंबूर प्रधान डाकघर, टेन्थ रोड, मुंबई- ७१.<br>६) बोरिवली प्रधान डाकघर, एम.एच.बी. कॉलनी, मुंबई- ९१.<br>७) माहिम प्रधान डाकघर,टी.एच.कटारिया मार्ग, मुंबई- १६.<br>८) मुंबई सेंट्रल प्रधान डाकघर, डॉ. बेलासिस रोड, मुंबई- ८.<br>९) माझगाव डिलिव्हरी पोस्ट ऑफिस, तळमजला, पोरबंदरवाला अपार्टमेंट, माझगांव, मुंबई- १०.<br>१०) स्टॉक एक्स्चेंज पोस्ट ऑफिस, फोर्ट मेन्शन, हमाम स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- १.<br>११) मुंबई जी.पी.ओ. मुंबई- १. |
| **३५** | **नवी मुंबई** | १) वाशी पोस्ट ऑफिस, प्लॉट नंबर १८ व १९, सेक्टर-१६ अ, वाशी-४००७०३.<br>२) कोकण भवन पोस्ट ऑफीस, विभागीय आयुक्त कार्यालय, सिडको भवन समोर, सीबीडी बेलापूर- ४००६१४.<br>३) पनवेल प्रधान डाकघर, संत साईबाबा स्कूलजवळ, सेक्टर -१९, नवीन पनवेल, ४१०२०६.<br>४) पनवेल शहर पोस्ट ऑफीस, सिटी पोस्ट ऑफीस, पनवेल - ४१० २०६.<br>५) नेरुळ पोस्ट ऑफीस, सेक्टर -३, बस डेपोजवळ, नेरुळ - ४००७०६.<br>६) ओ. एन.जी.सी. पोस्ट ऑफीस, ओ.एन.जी.सी. कॉम्प्लेक्स, ४१० २२१.<br>७) कळंबोली पोस्ट ऑफीस, कळंबोली नोड, सेक्टर-३-ई ४१० २१८.<br>८) खोपोली पोस्ट ऑफीस, खोपोली - ४१० २०३. |

**७.३** अर्जासह माहितीपुस्तिका उपलब्ध असलेल्या पोस्ट कार्यालयांची यादी आयोगाच्या वेबसाईटवरही **(www.mpsc.gov.in)** उपलब्ध आहे.

**७.४** अर्जासह माहितीपुस्तिकेची किंमत **रुपये १००/-** इतकी आहे.

**७.५** पूर्व परीक्षेच्या वेळी उमेदवारांनी विकत घेतलेल्या माहितीपुस्तिकेत मुख्य परीक्षेचा अर्ज असल्यास उमेदवारांनी प्रस्तुत मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी तो अर्ज भरुन टपाल कार्यालयात विहित वेळेत सादर करावा. तथापि असा अर्ज माहितीपुस्तिकेत नसल्यास उमेदवारांनी प्रस्तुत परीक्षेस अर्ज करण्यासाठी "**स्पर्धा परीक्षेकरिता अर्ज व माहितीपुस्तिका**" असे नमूद केलेली **फिक्कट निळया रंगाची** माहितीपुस्तिकाच विकत घ्यावी आणि त्यातील मुख्य परीक्षेसाठीचा अर्ज भरुन पाठवावा असे उमेदवारांना सूचित करण्यात येत आहे.

**७.६** अर्ज एकदाच व फक्त एकाच परीक्षेसाठी वापरता येईल.

**७.७** अर्जासह माहितीपुस्तिकेच्या विक्रीची व्यवस्था फक्त निवडक पोस्ट कार्यालयांतच करण्यात आली आहे. आयोगाच्या कार्यालयात अर्जाच्या विक्रीची कोणतीही व्यवस्था करण्यात आलेली नाही. तसेच, अर्ज मागविण्याकरिता पत्राद्वारे विनंती केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

**७.८** अर्जासह माहितीपुस्तिकेच्या उपलब्धतेबाबत कोणतीही अडचण उद्भवल्यास उमेदवारांनी संबंधित पोस्ट मास्टर अथवा आयोगाच्या कार्यालयाशी मुखपृष्ठावर नमूद केलेल्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

**८. अर्ज सादर करण्याचे ठिकाण व अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक :-**

**८.१** संपूर्ण भरलेला अर्ज माहितीपुस्तिकेतील परिच्छेद ६.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रमाणपत्राच्या प्रती व परीक्षा शुल्कासह वर नमूद केलेल्या पोस्ट कार्यालयांपैकी कोणत्याही ठिकाणी पोस्टाच्या कार्यालयीन वेळेत **दिनांक** ७ **ऑक्टोबर, २०१०** पर्यंत स्वीकारण्यात येईल.

**८.२** संपूर्ण भरलेला अर्ज व परीक्षा शुल्क फक्त पोस्ट कार्यालयामार्फतच विहित कालावधीत स्वीकारण्यात येईल. आयोगाच्या कार्यालयात कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्वीकारला जाणार नाही. अथवा त्यासंदर्भातील चौकशीची दखल घेतली जाणार नाही.

**९. शुल्क :-**

**९.१** अमागास - रुपये ३००/-

**९.२** मागासवर्गीय - रूपये १५०/-

**९.३** परीक्षा शुल्क टपाल कार्यालयात अर्जासोबत रोखीने भरणे आवश्यक आहे.

**१०. अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-**

**१०.१** माहितीपुस्तिकेच्या **भाग - सहा** मध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित (Xerox) प्रती अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**१०.२** उमेदवाराने मुलाखतीच्या दिवशी सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

**११. पदांबाबतची इतर माहिती, परीक्षा योजना, आरक्षण निवडीचे सर्वसाधारण स्वरुप, प्रमाणपत्राचे नमूने, परीक्षा केंद्र इ. माहिती माहितीपुस्तिकेत उपलब्ध करून देण्यात आली आहे.**

**१२. गुणांची पडताळणी करण्याबाबतची पध्दत:-**

**१२.१** गुणपत्रिका निर्गमित केल्याच्या दिनांकापासून साधारणत: एका महिन्याच्या आत उमेदवाराने गुणांची पडताळणी करण्याकरिता गुणपत्रिकेच्या झेरॉक्स प्रतीसह साध्या कागदावर अर्ज केल्यास त्याचा विचार केला जाईल. मात्र अर्जासोबत प्रत्येक विषयाला रुपये १००/- प्रमाणे **SECRETARY, MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION** यांच्या नावे रेखांकित केलेला आवश्यक त्या रकमेचा व मुंबई येथे देय असलेला डिमांड ड्राफ्ट जोडणे आवश्यक राहील.

**१२.२** पडताळणीसाठी अर्ज सादर करताना अर्जामध्ये परीक्षेचे नाव, बैठक क्रमांक, पडताळणीचे विषय, तसेच डिमांड ड्राफ्टचा क्रमांक व दिनांक, बँकेचे नाव व रक्कम इत्यादीबाबतचा तपशील नमूद करणे आवश्यक आहे. शिवाय डिमांड ड्राफ्टच्या पाठीमागे उमेदवाराने स्वत:चे नाव व बैठक क्रमांक नमूद करावा.

**१३. प्रस्तुत परीक्षेचा अभ्यासक्रम माहितीपुस्तिकेतील परिच्छेद क्र.२.२.५.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल.**

**ठिकाण :- मुंबई**
**दिनांक :- ८/९/२०१०**

**दी.प्र.मिरजकर**
**उप सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**